रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जानेवारी ६, २००९/पौष १६, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जानेवारी २००९

### आदेश

क्रमांक रानिआ./मनपा/२००९/प्र.क्र. १/का-५.—भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने आकाशवाणीवरील जाहिरातींसाठीच्या संहितेमध्ये अशी तरतूद केली आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता आचारसंहिता ज्यावेळी लागू असेल त्यावेळी या निवडणुकांकरिता जाहिराती प्रसारित करता येतील. परंतु, अशा जाहिराती राज्य निवडणूक आयोगाने प्रसारित होण्यापूर्वी त्याच्या छाननीस अनुसरुन असतील.

२. वरील तरतुदीस अनुसरुन राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, महाराष्ट्रातील कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी राजकीय पक्षाच्या वतीने किंवा अपक्ष उमेदवाराच्या वतीने राजकीय मजकूर असलेल्या जाहिराती विविध टेलिव्हिजन वाहिन्या, केबल नेटवर्क, आकाशवाणी, आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या खाजगी एफएम वाहिन्या यावरून संबंधित सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता अंमलात असताना प्रसारित करता येतील. मात्र, अशा जाहिरातीसाठी प्रसारित करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र आवश्यक असेल. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकींच्याबाबतीत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास असतील.

३. राजकीय पक्षांनी अथवा उमेदवारांनी अर्जासह अशा जाहिरातीची ध्वनीफित/चित्रफित/सीडी/प्रस्तावित जाहिरातीच्या साक्षांकित प्रतिलेखांसह (Transcript) राज्य निवडणूक आयोगाकडे जाहिरात प्रसारित करण्याच्या दिनांकापूर्वी किमान ५ दिवस आधी सादर करावे.

४. राज्य निवडणूक आयोगाकडे प्रसारणाचे प्रमाणपत्रासाठी आलेल्या जाहिरातींची एक नोंदवही ठेवावी. या नोंदवहीमध्ये प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जाची नोंद ठेवण्यात यावी. तसेच त्या अर्जावर काय निर्णय झाला, याचीही नोंद त्या नोंदवहीत असावी. अर्जाचा नमुना परिशिष्ट-१ मध्ये दिला आहे. देण्यात आलेल्या प्रत्येक प्रसारणाचे प्रमाणपत्र परिशिष्ट-२ मध्ये दिल्याप्रमाणे असावे. अर्जदाराने प्रत्येक प्रस्तावित जाहिरातीच्या तीन प्रती इलेक्ट्रॉनिक माध्यमातून द्यावयास हव्या. त्यासोबतच त्याने साक्षांकित केलेल्या त्या जाहिरातीचे प्रतिलेख द्यावयास हवे.



[किंमत : रुपये २०.००]

भाग एक—अ (म. उ. वि.)—१

५. आलेल्या प्रत्येक अर्जाची नोंदवहीमध्ये योग्य ती नोंद ठेवण्यात यावी. प्रत्येक अर्जाला अनुक्रमांक देण्यात यावा. अनुक्रमांक त्याने सादर केलेल्या प्रस्तावित जाहिरातीच्या प्रतिलेखावरही घालण्यात यावा. अशा कोणत्याही जाहिरातीला मान्य दिल्यानंतर प्रत्येक जाहिरातीची एक इलेक्ट्रॉनिक प्रत की जिला राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे ती आयोगाक ठेवण्यात यावी.

६. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात टेलिव्हिजन किंवा रेडिओवर जाहिराती देण्यासाठी आलेले अर्ज व त्यासोब आलेले साहित्य तपासण्यासाठी एक समिती स्थापन करतील. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल :—

(१) प्रधान सचिव / सचिव, राज्य निवडणूक आयोग

(२) उप सचिव, राज्य निवडणूक आयोग

(३) उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग

(४) संबंधित विधी अधिकारी, राज्य निवडणूक आयोग

(५) संबंधित अवर सचिव किंवा संबंधित सहायक आयुक्त.

माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे याबाबतीतील सर्व कागदपत्रे राहतील व ते समिती कामकाजात मदत करतील.

७. कुठलीही टेलिव्हिजन वाहिनी किंवा रेडिओ वाहिनी किंवा केबल प्रक्षेपक अशी कोणतीही जाहिरात प्रसारित कर नाहीत की जी राज्य निवडणूक आयोगाने काढलेल्या आचारसंहितेसंबंधी आदेशास विपरीत असेल किंवा त्या जाहिरातीम भारतामधील किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही अधिनियमातील तरतुदींचे पालन होत नसेल व अशा जाहिरातींमध्ये सभ्यतेचे संकेत पाळण्यात यावेत.

८. अशा जाहिरातींचे प्रक्षेपण महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी यावर लक्ष ठेवावे. राज्य निवडणूक आयोग कोणत जाहिरातीस मान्यता दिल्यानंतर त्या जाहिरातीची प्रतिलेखासह एक प्रत संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा संब जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविल.

९. अशा जाहिरातींवर होणारा खर्च हा जाहिरात एखाद्या उमेदवारातर्फे देण्यात आली असेल तर उमेदवाराच्या निवड खर्चात समाविष्ट केला जाईल किंवा अशी जाहिरात जर पक्षातर्फे देण्यात आली असेल तर तो खर्च त्या पक्षातर्फे उभ्या कर आलेल्या सर्व उमेदवारांमध्ये विभागून भागविला जाईल.

१०. अशा प्रस्तावित जाहिरातींसंबंधीचे अर्ज आयोगाकडे जाहिरातीच्या प्रस्तावित प्रसारणाच्या किमान ५ दिवस अ प्राप्त झाले पाहिजे.

(क) प्रस्तावित जाहिरात तयार करण्यासाठी किती खर्च आला आहे हेदेखील अर्जामध्ये नमूद केलेले असावे.

(ख) प्रस्तावित जाहिरात टेलिव्हिजन किंवा रेडिओवर प्रसारित करण्यासाठी येणारा अंदाजे खर्च आणि त्यामध जाहिरात प्रत्येक दिवशी किती वेळा दाखविण्यात येणार आहे आणि प्रत्येक वेळी ती जाहिरात दाखविण्यासाठी येणारा खर्च हेदे नमूद केलेले असावे.

(ग) अर्जामध्ये ही जाहिरात कोणत्या उमेदवारासाठी / पक्षासाठी देण्यात येणार आहे तेही नमूद केलेले असावे.

(घ) एखादी जाहिरात किंवा एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या वैयक्तिक कुवतीनुसार दिली असेल अशी व्यक्ती कोण राजकीय पक्षाशी किंवा उमेदवाराशी संबंधित नसेल तर अशा व्यक्तीला अर्जासोबत असे शपथपत्र जोडावे लागेल की ही ज कोणत्याही राजकीय पक्षाच्या फायद्यासाठी किंवा उमेदवाराच्या फायद्यासाठी नाही आणि या जाहिरातीसाठी येणारा कोणत्याही राजकीय पक्षाद्वारे वा उमेदवाराद्वारे देण्यात येणार नाही.

(ह) या अर्जासोबत असेही निवेदन द्यावे लागेल की, या जाहिरातीसाठी देण्यात येणारी सर्व राशी मग ती जाहिरात करण्यासाठी येणारा खर्च असो किंवा ती प्रसारित करण्यासाठी येणारा खर्च असो धनादेश अथवा धनाकर्षाद्वारे देण्यात

## परिशिष्ट-एक

**टेलिव्हिजन अथवा रेडिओवर प्रसारित होणाऱ्या जाहिरातीसाठी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव

(२) अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता

(३) प्रस्तावित जाहिरात कोणत्याही राजकीय पक्षाद्वारे/निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारातर्फे/अन्य व्यक्तींतर्फे/नागरिकांच्या समूहातर्फे/असोसिएशन ऑर्गनायझेशन न्यासतर्फे देण्यात येणार आहे काय (नाव द्यावे)

(४) (क) राजकीय पक्ष असल्यास त्या पक्षाचा दर्जा (पक्ष मान्यताप्राप्त राष्ट्रीय/राज्य किंवा मान्यता नसलेला पक्ष)

(ख) जर जाहिरात उमेदवारातर्फे देण्यात येणार असेल तर उमेदवार लढवित असलेल्या प्रभागाचा/मतदार गटाचा किंवा मतदार गणाचा क्रमांक.

(५) पक्षाचा मुख्यालयाचा पत्ता (राजकीय पक्ष/असोसिएशन ऑर्गनायझेशन, न्यास) (नांव)

(६) टेलिव्हिजन वाहिनी/केबल नेटवर्क/रेडिओ वाहिनी की ज्या वाहिनीवर जाहिरात प्रसारित होणार आहे

(७) (क) जाहिरात कोणत्या विशिष्ट उमेदवारासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे काय ?

(ख) जर असेल तर अशा उमेदवाराचे/ उमेदवारांची नावे व पत्ता आणि ते लढवित असलेला प्रभाग, मतदार गट/मतदार गण यांचे क्रमांक

(८) प्रत्यक्ष प्रस्तावित जाहिरातीचा प्रसारणाचा दिनांक

(९) जाहिरातीमध्ये वापरण्यात येणारी भाषा (प्रत्येक भाषेमधील जाहिरातीच्या दोन इलेक्ट्रॉनिक प्रती व त्यासोबत एक साक्षांकित केलेला प्रतिलेख)

(१०) जाहिरातीचे शीर्षक

(११) जाहिरात तयार करण्यासाठी आलेला खर्च

(१२) जाहिरातीच्या प्रसारणाचा अंदाजे खर्च व जाहिरात प्रत्येक दिवशी किती वेळा दाखविण्यात येणार आहे त्याची संख्या व प्रत्येक वेळी जाहिरात प्रसारित करण्यासाठी येणारा खर्च

(१३) एकूण खर्च

मी श्री./श्रीमती ———————— पूर्ण पत्ता ———————— याची खात्री देतो की, या अर्जासोबत देण्यात आलेली जाहिरात तयार करण्यासाठी व प्रसारित करण्यासाठी आलेला खर्च हा धनादेशाद्वारे अथवा धनाकर्षाद्वारे केलेला आहे किंवा करण्यात येणार आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही

व्यक्ती किंवा व्यक्तींद्वारे देण्यात येणाऱ्या जाहिरातीसाठी की, जे राजकीय पक्षाशी किंवा कुठल्याही उमेदवाराशी संबंधित नाही.

मी श्री./श्रीमती ———————— पूर्ण पत्ता ———————— याची खात्री देतो की, सोबत जोडलेली प्रस्तावित जाहिरात कोणत्याही राजकीय पक्षाच्या अथवा कोणत्याही उमेदवाराच्या व्यक्तीसाठी नाही आणि या जाहिरातीसाठी येणारा खर्च कोणत्याही स्वरुपात कुठल्याही राजकीय पक्षाने अथवा कुठल्याही उमेदवाराने दिलेला नाही अथवा देणार नाही.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही

## परिशिष्ट-दोन

### जाहिरात प्रसारित करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :

(२) अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता :

(३) जाहिरातीचे शीर्षक :

(४) जाहिरात प्रसारणासाठी लागणारा कालावधी :

(५) जाहिरात कोणत्या भाषांमध्ये आहे :

(६) जाहिरातीचा प्रस्ताव सादर केला ती तारीख :

(७) जाहिरात प्रसारित करण्यासाठी प्रमाणपत्र देण्याची तारीख :

असे प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केलेली जाहिरात प्रसारणासाठी योग्य आहे व ती राज्य निवडणूक आयोगाने याबाबतीत प्रसिद्ध केलेल्या निदेशांना अनुसरुन आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

ठिकाण :

दिनांक :

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**उपमन्यु चॅटर्जी,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग.

# STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opp. Mantralaya, Madame Cama Road, Mumbai 400 032
dated the 6th January 2009

## Order

No. SEC/MC/2009/CR-1/D-5.—The Ministry of Information and Broadcasting, Government of India, has amended the code for commercial advertising to provide for broadcast / telecast of political advertisements for local body elections subject to pre-broadcast / telecast scrutiny by the State Election Commissions.

2. In view of the above provision, the State Election Commission hereby orders that advertisements of political nature on TV channels, cable networks, FM channels could be broadcast / telecast during the model code of conduct for general elections. However, for broadcast / telecast of such advertisements, certification of advertisement for broadcast / telecast shall be necessary. The powers to issue such certificate shall be with the State Election Commission for all local bodies.

3. Application for certification shall be submitted to the State Election Commission in electronic form along with an attested transcript thereof, at least 5 days before the proposed broadcast / telecast of the advertisement.

4. A proper record in a register shall be maintained for all applications received for certification. Each application shall be serially numbered and the serial number shall also be indicated on the three copies in electronic form and the format for application shall be as prescribed in Annexure 1 and certification for broadcast / telecast shall be as in Annexure 2. The applicant should submit three copies in electronic format of the proposed advertisement along with transcript of the proposed advertisement.

5. Each application received shall be recorded in a register. Each application shall be given serial number. This serial number shall be mentioned on the transcript of the proposed advertisement. After certification of broadcast / telecast, one electronic copy of such advertisement should be retained with the concerned officer.

6. In the office of the State Election Commission, there shall be constituted a committee to scrutinize all applications and material submitted with them. The Committee shall be as under :—

(1) Principal Secretary / Secretary, State Election Commission

(2) Deputy Secretary, State Election Commission

(3) Deputy Commissioner, State Election Commission

(4) Concerned Law Officer, State Election Commission

(5) Concerned Under Secretary or concerned Assistant Commissioner, State Election Commission.

The Information and Public Relations Officer, State Election Commission shall maintain all the necessary record in this context and he shall assist the Committee in its working.

7. Any TV channel, radio channel, cable operator will not broadcast / telecast any political advertisement which will not be in consonance with the orders issued by the State Election Commission on model code of conduct or if that advertisement violates any provision in the Act in India or Maharashtra, such advertisement will not violate all norms of decency and morality.

8. All such advertisements will be monitored by the concerned Municipal Commissioner or the Collector. The State Election Commission shall forward a copy of the advertisement along with a copy of transcript to the concerned Municipal Commissioner or the concerned Collector.

9. Any expenditure on such advertisement will be added to the election expenditure of the candidate in case of an advertisement given by a candidate or if the candidate is given by the political party, then the expenditure on such advertisement will be divided equally among all the candidates fielded by such political party.

10. Application for proposed advertisement should reach the office of the Commission at least 5 days before the proposed broadcast / telecast.

(*a*) The application should mention the expenditure incurred on making of such an advertisement.

(*b*) The proposed expenditure for broadcast / telecast of proposed advertisement and the proposed insertion of the advertisement and expenditure for each insertion should also be mentioned.

(c) The application should mention that the advertisement is prepared on behalf of which candidate / political party

(d) If advertisement is issued by any person other than political party or a candidate, the person should state on oath that the advertisement is not for the benefit of any political party or for the benefit of any candidate and the advertisement is not sponsored by any political party or candidate.

(e) A statement shall be made that all the payment shall be made by way of cheque or demand draft.

*ANNEXURE 1*

## Application for Certification of Advertisement

(i) Name of the local body

(ii) Name and full address of the applicant

(iii) Whether the advertisement is by a political party / contesting candidate any other person / group of persons association / organization / Trust (give the name)

(iv) (a) In case of political party, the status of the party (whether recognized National / State / Unrecognized party)

(b) In case of a candidate, number and name from where contesting

(v) Address of Headquarters of political party / group or body of persons / association / organization / Trust

(vi) Channels / cable networks on which the advertisement is proposed to be telecast

(vii) (a) Is the advertisement for the benefit of prospects of election of any candidate(s)

(b) If so, give the name(s) of such candidate(s) with full address and name(s) of constituency(ies)

(viii) Date of submission of the advertisement

(ix) Language(s) used in the advertisement (advertisement is to be submitted with two copies in electronic form alongwith a duly attested transcript)

(x) Title of advertisement

~~(xi) Cost of production of the advertisement~~

(xii) Approximate cost of proposed telecast with the breakup of number of insertions and rate proposed for each such insertion

(xiii) Total expenditure involved (in Rupees)

I, Shri/Smt. .......................................... S/o /D/o W/o .......................................................................... (full address) .................................................................... undertake that all payments related to the production and telecast of this advertisement will be made by way of cheque / demand draft.

Place :

Date : Signature of the Applicant

(Applicable for advertisement by a person / persons, other than a political party or a candidate)

I, Shri/Smt. .......................................... S/o /D/o W/o .......................................................................... (full address) .................................................................... hereby state and affirm that the advertisement(s) submitted herewith is not for the benefit of any political party or any candidate and that this advertisement(s) has / have not been sponsored / commissioned or paid for by any political party or a candidate.

Place :

Date : Signature of the Applicant

*ANNEXURE - 2*

**Certification of Advertisement for Broadcast / Telecast**

(i) Name of the local body

(ii) Name and address of the applicant/political party/ candidate person/group of persons/association; organization Trust

(iii) Title of advertisement

(iv) Duration of advertisement

(v) Language(s) used in advertisement

(vi) Date of submission of advertisement

(vii) Date of certification for broadcast/telecast

Certified that the above advertisement is fit for broadcast / telecast as per the guidelines prescribed by the State Election Commission.

Place :

Date :

Authorised Officer

By order of the State Election Commissioner.

UPAMANYU CHATTERJEE,
Secretary,
State Election Commission.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई